महाराष्ट्र शासन
ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी क्र. :- (०२२) २२६६४६३८
Website:-www.dol.maharashtra.gov.in E-mail:- director.dol@maharashtra.gov.in

जा. क्र.३१/ग्रंथ पार्सल/२०२४-२५/४४१० दिनांक :- १/१०/२०२४

# दरपत्रक मागणीपत्र

**१००० शासनमान्य ग्रंथालयांना ग्रंथ वितरण करण्यासाठी ग्रंथांचे पार्सल बनविण्याबाबत दरपत्रक मिळणेबाबत......**

महाराष्ट्रातील १००० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या थेट पत्त्यावर ग्रंथसंच वितरीत करावयाच्या असल्याने ग्रंथसंच पार्सल तयार करण्यासाठी खालील **अटी व शर्तीच्या अधिन राहून महाराष्ट्रातील पार्सल तयार करणाऱ्या पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.**

१. ग्रंथांचे वितरण यादीनुसार ग्रंथ संच तयार करुन ग्रंथांचे पार्सल तयार करणे. ग्रंथसंच पार्सल प्लास्टीकने आच्छादीत करणे, पार्सल मजबुतीसाठी लोखंडी पट्टी मारणे, पार्सल शिवणे, इ. सोपस्कार असणे आवश्यक राहील. पार्सलवर लाभार्थी ग्रंथालयांचे व पाठविणा-याचे नाव ठळक अक्षरात मराठीत लिहिणे.

२. पार्सल तयार करून वितरीत करेपर्यंत करावयास लागणाऱ्या प्रक्रियेसाठी जागेची व्यवस्था वर्तक नगर, ठाणे येथे करण्यात आलेली आहे. तेथेच वरील प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

३. प्रत्येकी एक ग्रंथ पार्सल याप्रमाणे एकूण १००० पार्सल्स तयार करावयावची आहेत. एका पार्सलमध्ये सुमारे ६० ते ७० दरम्यान ग्रंथ असतील.

४. या कामासाठी अग्रिम देण्याची तरतूद नाही.

५. दरपत्रक प्रक्रियेबाबतचे सर्वाधिकार ग्रंथालय संचालक यांनी राखून ठेवले आहेत.

वर नमुद केलेल्या बाबी गृहित धरुन पार्सल तयार करण्यासाठी व त्यासंबंधी लागणारे साहित्य उदा. कतान, प्लास्टिक शीट, सुतळी, लोखंडी पट्टया, इत्यादी सर्व मिळून प्रत्येकी (एक) पार्सलसाठी किती खर्च येईल.

**याबाबतचे दरपत्रक दिनांक २०/१०/२०२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१ यांना सादर कराव्यात.** याबाबतच्या अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी दूरध्वनी क्र. २२६६४६३८ / २२६७१३३३ संपर्क साधावा.

(अशोक मा. गाडेकर)
प्र. ग्रंथालय संचालक